क्र. १४३ पहिले वर्ष

०७ मे २०२३

# रविवारची उपासना

## पुनरुत्थानानंतरचा पाचवा रविवार

### प्रस्तावना

परमेश्वराने जीवनाचा मार्ग सत्याच्या अधिष्ठानावर उभारण्यासाठी देवाने आपल्या पुत्राला ह्या जगात पाठविले. आपली प्रतिमा व गौरव त्याने आपल्या पुत्राद्वारे ह्या जगात प्रकट केला. पुत्राने आपल्या कार्याद्वारे परमेश्वर पित्याची ओळख जगाला पटवून दिली. म्हणूनच ख्रिस्त मार्ग आहे, अंतिम सत्य आहे व तोच जीवन आहे. परमेश्वर पित्याकडे जाण्याचा ख्रिस्त हाच एकमेव मार्ग आहे. हा मार्ग आपण आपल्या जीवनात अनुसरावा, ख्रिस्ती सत्याच्या आधारावर आपले जीवन उभारावे म्हणून आपण ह्या मिस्साबलीत विशेष प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे प्रभो, आमच्या स्वर्गीय बापा, आम्हाकडे आपली दयादृष्टी वळव. तू आम्हाला पापमुक्त करतोस व ख्रिस्ताठायी तुझी मुले बनवतोस. आम्हाला परिपूर्ण स्वातंत्र्य दे व तू अभिवचन दिलेल्या वतनाचा स्विकार करावयास आम्हाला पात्र कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

प्रभूशब्द विधी

### पहिले वाचन

**प्रेषितांची कृत्ये या पुस्तकातून घेतलेले वाचन ६:१–७**

**“त्यांनी पवित्र आत्म्याने परिपूर्ण असे सात प्रतिष्ठित पुरुष निवडले.”**

शिष्यांची संख्या वाढत चालली असता हेल्लेणी यहुद्यांची इब्री लोकांविरुध्द कुरकुर सुरू झाली. कारण रोजच्या वाटणीत त्यांच्या विधवांची उपेक्षा होत असे. तेव्हा बारा प्रेषितांनी शिष्यगणाला बोलावून म्हटले, “आम्ही देवाचे वचन सांगण्याचे सोडून पंक्तिसेवा करावी हे ठीक नाही. तर बंधुजनहो, तुम्ही आपल्यामधून पवित्र आत्म्याने आणि ज्ञानाने पूर्ण असे सात प्रतिष्ठित पुरुष शोधून काढा. त्यांना आम्ही ह्या कामावर नेमू. म्हणजे आम्ही स्वत: प्रार्थनेत आणि वचनाच्या सेवेत तत्पर राहू.” ही गोष्ट सर्व लोकांना पसंत पडली आणि त्यांनी विश्वासाने आणि पवित्र आत्म्याने पूर्ण असा पुरुष स्तेफन आणि फिलीप, प्रखर, निकातुर, तीमोन, धार्मिक आणि यहुदीय मतानुसार निकलाव अंत्युखीयकर ह्यांची निवड केली. त्यांना त्यांनी प्रेषितांसमोर उभे केले आणि त्यांनी प्रार्थना करून त्यांच्यावर हात ठेवले.

मग देवाच्या वचनाचा प्रसार होत गेला, यरुशलेमात शिष्यांची संख्या फार वाढत गेली. याजकवर्गातीलही पुष्कळ लोकांनी ह्या विश्वासाला मान्यता दिली.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

३२:१–२, ४–५, १८–१९

प्रतिसाद : **हे प्रभो, तुझ्या प्रेमाची पाखर आम्हांवर घाल.**

१. अहो धार्मिकहो, परमेश्वराचा जयजयकार करा. सज्जनांस स्तुतीगान शोभते. वीणेवर
परमेश्वराचे उपकारस्मरण करा. दशतंतू
वाद्यावर त्याचे गुणगान गा.

२. परमेश्वराचे वचन सरळ आहे.
त्याची सर्व कृत्ये सत्याची आहे.
त्याला नीती आणि न्याय ही प्रिय आहेत.
परमेश्वराच्या वात्सल्याने पृथ्वी भरली आहे.

३. पाहा, जे परमेश्वरचे भय धरतात आणि
त्याच्या प्रेमाची अपेक्षा करतात. त्यांचा
जीव मृत्यूपासून सोडवावा आणि दुष्काळात त्यांचा प्राण वाचवावा,
म्हणून त्यांच्यावर
त्याची नजर असते.

### दुसरे वाचन

**पेत्राचे पहिले पत्र यातून घेतलेले वाचन २:४–९**

**“तुम्ही निवडलेला वंश, राजघराण्यातील याजकगण आहा.”**

माणसांनी नाकारलेला तो देवाच्या दृष्टीने निवडलेला आणि मूल्यवान असा जो जिवंत धोंडा त्याच्याजवळ येत असता, तुम्हीही स्वत: जिवंत धोंड्यासारखे आध्यात्मिक मंदिर असे रचले जात आहा; ह्यासाठी येशू ख्रिस्ताद्वारे देवाला आवडणारे आध्यात्मिक यज्ञ अर्पिण्यास तुम्ही पवित्र याजकगण व्हावे. कारण असा शास्त्रलेख आहे :

“पाहा, निवडलेली मूल्यवान अशी कोनशिला मी सियोनात बसवतो. तिच्यावर श्रध्दा ठेवणारा फजीत होणार नाही.” ह्यास्तव तुम्हा श्रध्दा ठेवणाऱ्यांना ती मूल्यवान आहे, परंतु जे श्रध्दा ठेवत नाहीत त्यांना “बांधणाऱ्यांनी नापसंत केलेला धोंडा तोच कोनशिला झाला.” आणि ठेच लागण्याचा धोंडा आणि अडखळण्याचा खडक असा झाला.” ते वचन मानीत नसल्यामुळे ठेचाळतात, त्यासाठी ते नेमलेही होते. पण तुम्ही तर निवडलेला वंश, राजकीय याजकगण, पवित्र राष्ट्र, देवाचे स्वत:चे लोक असे आहा. ह्यासाठी ज्याने तुम्हांस अंध:कारातून काढून आपल्या अद्भुत प्रकाशात पाचारण केले त्याचे गुण तुम्ही प्रसिध्द करावे.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान १४:५**

**आलेलुया, आलेलुया!**

येशूने म्हटले, “मार्ग, सत्य आणि जीवन मीच आहे; माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही.”

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**योहानलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन १४:१–१२**

**“मार्ग, सत्य आणि जीवन मीच आहे.”**

येशू त्याच्या शिष्यांस म्हणाला, “तुमचे अंत:करण अस्वस्थ होऊ नये, देवावर श्रध्दा ठेवा आणि माझ्यावरही श्रध्दा ठेवा. माझ्या पित्याच्या घरात राहण्याच्या जागा पुष्कळ आहेत. नसत्या तर मी तुम्हांला तसे सांगितले असते. मी तुम्हांसाठी जागा तयार करावयास जातो आणि मी जाऊन तुम्हांसाठी जागा तयार केली म्हणजे पुन्हा येऊन तुम्हांस आपणाजवळ घेईन. ह्यासाठी जेथे मी आहे तेथे तुम्हीही असावे. मी जातो तिकडचा मार्ग तुम्हास ठाऊक आहे.” थोमा त्याला म्हणाला, “प्रभो,

आपण कोठे जाता हे आम्हास ठाऊक नाही. मग मार्ग आम्हांस कसा ठाऊक असणार?'' येशूने त्याला म्हटले, ''मार्ग, सत्य आणि जीवन मीच आहे. माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही. मी कोण आहे हे तुम्ही ओळखले असते तर माझ्या पित्यालाही ओळखले असते. आतापासून पुढे तुम्ही त्याला ओळखता आणि तुम्ही त्याला पाहिलेही आहे.

फिलीप त्याला म्हणाला, ''प्रभो, आम्हांला पिता दाखवा म्हणजे आम्हांला पुरे आहे.'' येशूने त्याला म्हटले, ''फिलीप, मी इतका काळ तुम्हांजवळ असूनही तू मला ओळखत नाहीस काय? ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे. तर आम्हाला पिता दाखवा असे तू का म्हणतोस? मी पित्यामध्ये आणि पिता माझ्यामध्ये आहे अशी श्रध्दा तू धरीत नाहीस काय? ज्या गोष्टी मी तुम्हांला सांगतो त्या मी, आपल्या स्वत:च्या सांगत नाही. माझ्यामध्ये राहणारा पिता स्वत:ची कार्ये करतो. मी पित्यामध्ये आणि पिता माझ्यामध्ये आहे हे माझे तुम्ही खरे माना, नाहीतर माझ्या कृत्यांमुळे तरी माझे खरे माना.''

मी तुम्हांला सत्य सांगतो, मी जी कृत्ये करतो ती माझ्यावर श्रध्दा ठेवणाराही करीन आणि त्यापेक्षा मोठी करील, कारण मी पित्याकडे जातो.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वरपित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या : तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा आपण विश्वास बाळगू या.

आपला प्रतिसाद असेल – **हे परमेश्वरा, दया कर, आणि तुझ्या लोकांची प्रार्थना ऐक.**

१. ख्रिस्तसभेची समर्थपणे धुरा सांभाळणाऱ्या धर्मगुरू, धर्मभगिनी व धर्मबंधूंना परमेश्वराच्या दयेचा, प्रेमाचा व कृपेचा स्पर्श व्हावा, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

२. आपल्या कुटुंबात, गावामध्ये, समाजामध्ये शांती, प्रेम व ऐक्य सतत नांदत राहावे म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

३. आपल्या प्रत्येकाच्या नोकरीधंद्यावर व शेतीवाडीतील कामावर परमेश्वराचा भरपूर आशीर्वाद असावा व आमचे जीवन बहरावे म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

४. आपल्या युवक मित्रमंडळीला वेगवेगळ्या ऐहिक मोहपाशांशी मुकाबला करावा लागत आहे. त्या अग्निदिव्यातून जात असताना युवक-युवतींनी आपल्यामधील विकारांच्या अंधारावर मात करून विवेकबुध्दीच्या प्रकाशात मार्गक्रमण करीत राहावे, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

५. आपल्या कौटुंबिक व वैयक्तिक हेतूंसाठी, आपण प्रार्थना करूया.

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, परमेश्वरा, या पवित्र दानांच्या परतभेटीमुळे तझ्या दैवी जीवनात तू आम्हाला सहभागी करतोस. आमचे प्रत्येक कृत्य तुझ्या सत्यवचनाला अनुसरून असावे म्हणून आम्हाला कृपादान दे. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे दयाळू बापा, या पवित्र रहस्यांमुळे नव्या दिशेने आमची वाटचाल घडून येवो व तुझ्याठायी आम्हाला नवजीवन प्राप्त होवो, ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

प्रायश्चित्तकाळातील सहा आठवड्यांच्या रिट्रीटमध्ये श्रध्दावंतांनी परमेश्वराशी, शेजाऱ्यांशी आणि स्वत:शी असलेले नातेसंबंध सुधारावेत म्हणून ख्रिस्तसभेने त्यांना प्रार्थना, दानधर्म आणि उपवास ही त्रिसूत्री दिलेली होती. आता पुनरुत्थानकाळातील सात आठवड्यांमध्ये ख्रिस्तसभा त्यांना हेच संबंध अधिक भक्कम करण्यासाठी परमेश्वराशी ऐक्य, शेजाऱ्याची सेवा, स्वत:चे आत्मपरीक्षण असे मार्ग सुचवित आहे :

**अ) श्रध्दावंत समूहाची सेवा करतात :** आजच्या पहिल्या वाचनात (प्रे.कृ.६:१-७) सात डिकन्सची निवड कशी करण्यात आली त्याचे वर्णन करण्यात आलेले आहे. आरंभीच्या ख्रिस्तसभेत हिब्रू भाषिक यहुदी आणि ग्रीक भाषिक यहुदी अशा दोन प्रकारच्या गटांतील लोकांनी ख्रिस्ती श्रध्दा स्वीकारली होती. प्रभूशब्द घोषित करतानाच ह्या लोकांची पंक्तिसेवासुध्दा प्रेषितांना करावी लागत होती. परिणामत: ग्रीक भाषिक यहुदी – ख्रिस्ती बांधवांकडे दुर्लक्ष होत होते. त्यावर उपाय म्हणून सात प्रतिष्ठित आणि पवित्र आत्म्याने प्रेरित असलेले पुरुष निवडण्यात आले. ज्याने त्याने आपापल्या कुवतीनुसार समूहाची सेवा करावी असा संदेश पहिल्या वाचनात देण्यात आलेला आहे.

**ब) श्रध्दावंत आध्यात्मिक मंदिर उभारतात :** आजच्या दुसऱ्या वाचनात (१ पेत्र.२:४-९) संत पीटर श्रध्दावंतांना ''निवडलेला वंश, राजेशाही याजकगण आणि पवित्र राष्ट्र'' संबोधतो. पुनरुत्थित ख्रिस्तावर श्रध्दा ठेवणारी व्यक्ती ही 'मानवी स्वभाव असलेली आध्यात्मिक व्यक्ती असते, ती केवळ आध्यात्मिक स्वभाव असलेली मानवी व्यक्ती नसते.' ती सदैव आपल्या जीवनाचे परीक्षण करून आध्यात्मिक स्वभाव असलेली मानवी व्यक्ती नसते.' ती सदैव आपल्या जीवनाचे परीक्षण करून आध्यात्मिक मंदिर बांधत असते.

**क) श्रध्दावंत परमेश्वराशी एकरूप झालेले असतात :** आजच्या शुभवर्तमानात (योहान १४:१-१२) येशू आपले देवपित्याशी असलेले नातेसंबंध स्पष्ट करतो. तो आणि पिता एक असून आपण पित्याकडे जाणारा मार्ग आहोत असा दावा करतो. श्रध्दावंत येशूशी आणि पर्यायाने परमेश्वराशी सदैव एकरूप झालेले असावेत म्हणून येशू त्यांना मार्ग दाखवतो. सत्य प्रकट करतो आणि जीवन देतो.

**आत्मपरीक्षण :** या पुनरुत्थानकाळात माझे स्वत:शी, देवाशी आणि माझ्या समूहाशी असलेले नातेसंबंध दृढ करण्यासाठी मी काय काय करीत आहे?

●●●

| मे २०२३ | | दैनंदिन बायबल वाचने पहिला सप्ताह |
|---|---|---|
| सोम ०८ | टेरेंटाईजचे सं पीटर (पां) | : प्रे.कृ. १४:५-१८/योहान १४:२१-२६ |
| मंगळ ०९ | सं पीटर नोलास्का (पां) | : प्रे.कृ.१४:१९-२८/योहान १४:२७-३१ |
| बुध १० | सं अंतोनिअस (पां) | : प्रे.कृ. १५:१-६/योहान १५:१-८ |
| गुरू ११ | लाकोनीचे सं इग्नेशिअस (पां) | : प्रे.कृ.१५:७-२१/योहान १५:९-११ |
| शुक्र १२ | सं नेरियस,आखिलियुस आणि डॉमिटिला (पां/तां) | : प्रे.कृ.१५:२२-३१/योहान १५:१२-१७ |
| शनि १३ | सं मेरी माझरेल्लो (पां) | : प्रे.कृ.१६:१-१०/योहान १५:१८-२१ |